# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा–1/350/330 दिनांक : 28.1.2000.

परिपत्रक क्रमांक : 36

विषय : म.जी.प्रा. कडून बिगर घरगुती तत्वावर / व्यावसायीकांना होणारा पाणी पुरवठा.

काही नागरी पाणी पुरवठा योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरित करुन घेतलेल्या नाहीत म्हणून प्राधिकरणाकडून नाइलाजाने चालविण्यांत येत आहेत. काही ठिकाणी थेट ग्राहकांपर्यंत प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यांत येतो व पाणी देयकांची वसुली देखील प्राधिकरणाकडूनच करण्यांत येते अशा ठिकाणी ग्राहकांकडे असणारी थकबाकी वसुल होणे अत्यंत आवश्यक आहे.

बिगर घरगुती ग्राहकांकडे/व्यावसाईकांकडे पाणी पुरवठ्यापोटी असणा–या थकबाकीच्या वसुलीच्या अनुषंगाने दिनांक 15.1.2000 रोजी मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याकडे चर्चा झाली असता पाणी देयकांच्या वसुलीबाबत प्राधिकरणाकडून कठोरपणे कारवाई करण्यांत यावी अशा सूचना मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या आहेत.

या अनुषंगाने आपणास सूचना देण्यात येत आहेत की जे बिगर घरगुती ग्राहक / व्यावसायीक, नियमितपणे पाण्याची देयके अदा करत नाहीत त्यांना त्वरित नोटीस देण्यात यावी व नोटीस कालावधीत थकित देयकांची अदायगी करण्यांत आली नाही तर नोटीसचा कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांचा पाणी पुरवठा खंडित करण्यात यावा. अशा पाणी पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या ठिकाणचा पाणी पुरवठा, पाणी देयकांपोटी असणारी पूर्ण थकबाकी मिळाल्याशिवाय पुन्हा सुरु करण्यात येवू नये.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होत आहे याची क्षेत्रीय अभियंत्यांनी वेळोवेळी पाहणी करावी व अहवाल सादर करावा.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्या आदेशानुसार.

(सही) 28/1/2000
(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रीक)

खाजगी सचिव,
मा.मंत्री, पा.पु.स्व.

सचिव, पा.पु.व स्व.वि.,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव ( प्रशासन ) , म.जी.प्रा. मुंबई.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा., नवी मुंबई.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.सां.विभाग,